अतितात्काळ/कालमर्यादा/महत्वाचे

क्र.पोमसं/३१/२२३५/ठेसंवियो/२०२०-२०२१/३५/२०२१ मुंबई दि१० /०३/२०२२

संदर्भ - शासन निर्णय गृहविभाग क्र. बीयुडी-११२१/प्र.क्र.३०१/आस्था-१ दि ०२/०२/२०२२

विषय-लेखा अनुदान २०२१-२०२२
मागणी क्र. बी-६, मुख्य लेखाशिर्ष २२३५,
सामाजिक सुरक्षा व कल्याण,
१०४ ठेव संलग्न विमा योजना.

* * * * *

शासन निर्णय गृहविभाग क्र. बीयुडी-११२१/प्र.क्र.३०१/आस्था-१ दि ०२/०२/२०२२ अन्वये सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात मागणी क्र. बी-०६, मुख्यलेखाशिर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण १०४-ठेव संलग्न विमा योजने अंतर्गत रक्कम रु २,४०,००,०००/- एवढे अनुदान पोलीस महसंचालक कार्यालयास दर्शविले आहे. व संगणकीय वितरण प्रणालीवर (BDS) रक्कम रु २,४०,००,०००/- (अक्षरी रु दोन कोटी चाळीस लाख फक्त) दिसून येते. सोबत शासन आदेशाची प्रत जोडलेली आहे.

२. या कार्यालयाचे समक्रमांकाचे आदेश दि २१/२/२०२२ अन्वये या कार्यालयाच्या प्रतीक्षायादीवरील ४०० अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांना यादीनुसार रु २,४०,००,०००/- (अक्षरी रु. दोन कोटी चाळीस लाख फक्त) अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी रु ६०,०००/- समर्पित केल्याने सध्या शिल्लक अनुदान ६०,०००/- (अक्षरी रु. साठ हजार फक्त) असुन या कार्यालयाचे प्रतीक्षायादीवरील खालीलप्रमाणे नमुद केल्यानुसार १ अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांना अनुदान मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | घटक | मयत अधिकारी यांचे नाव | मृत्यु दिनांक | वारसदाराचे नाव व नाते | रक्कम | प्राधिकार पत्र | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. आ. ठाणे शहर | कुर्बान इस्माईल तडवी,पोह | १८-०८-१९ | श्रीमती-अफसाना-पत्नी, कु सुमय्या-मुलगी | पीएनएमएच-५०७०७ | क्र. भ.नि./पीएफ६/डीएलआयएस/एफआर २०९५२५०//सीएच-६/७९९ दि २७/०१/२०२२ | ६०००० |
| एकुण ठेव संलग्न विमा योजना खर्चित अनुदान (अक्षरी रुपये फक्त) | | | | | | | ६०००० |
| सदर आदेश निर्गमित करण्यापुर्वी ठेव संलग्न विमा योजने अंतर्गत मंजुर करण्यात आलेले मागील अनुदान | | | | | | | २४०००००० |
| मागील आदेश निर्गमित केल्यानंतर ठेव संलग्न विमा योजने अंतर्गत शिल्लक अनुदान | | | | | | | ०००० |
| या कार्यालयास सर्पित करण्यात आलेले अनुदान | | | | | | | ६०००० |
| शिल्लक ठेव संलग्न विमा योजना अनुदान | | | | | | | ०००० |
| एकुण ठेव संलग्न विमा योजना मंजुर अनुदान | | | | | | | २४०००००० |

३. ठेव संलग्न विमा योजनेअंतर्गत अनुदान मंजुरीचे प्राधिकार क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले असल्यामुळे, खालील नमूद घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील मृत अधिकारी/ कर्मचा-यांच्या वारसदारांचे अनुदान मंजुरीचे आदेश तात्काळ निर्गमित करुन त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.

४. शासनाने सदर शासन निर्णयान्वये चिन्हांकित करुन दिलेला निधी दि ३१/०३/२०२२ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत खर्च होणे आवश्यक आहे. सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात याची कृपया नोंद घ्यावी. तरी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची अचूक देयके सादर करावीत व ती देयके कोणत्याही परिस्थिती दि ३१/०३/२०२२ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच, संबंधित मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांना रक्कम अदा करणे ही, सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमखाची असल्यामुळे, सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी स्वत: लक्ष देऊन, त्यांचे कार्यालयातील लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपुर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात, जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग पुर्णत: होईल. संबंधित वारसदारांना अनुदान अदा केल्यानंतर त्यांची दिनांकित अदा रोल पावती देयकाच्या कोषागार प्रमाणपत्र क्रमांक दिनांकासह शासनास व महालेखापाल-१, मुंबई तसेच या कार्यालयास दिनांक ३१/०३/२०२२ पूर्वी न चुकता सादर करावी.

५. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ, महालेखापाल यांचे तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात यावी. त्यानुसार शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीनुसार, या कार्यालयाने मंजूर केलेल्या अनुदानाच्या खर्चाबाबतचा ताळमेळ संबंधित कोषागार कार्यालय व महालेखापाल यांचे कार्यालयातील नोंदविलेल्या खर्चाशी करुन खर्चमेळाची प्रमाणित माहिती दिनांक ३१/०३/२०२२ पुर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपुर्ण जबाबदारी ही क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांची राहील त्याप्रमाणे माहिती न पाठविणा-या कार्यालयातील संबंधितावर जबाबदारी निश्चीत करुन कारवाई करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्विकारण्यात येणार नाही व या कारणामुळे विलंब झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/ कार्यालय प्रमुखांची राहील.

६. सदरचा खर्च हा सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षातील, गृह विभाग, मागणी क्र. बी-६ मुख्यालेखाशिर्ष "२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण" गौणशिर्ष-१०४ ठेव संलग्न विमा योजना (सांकेतिक क्रमांक २२३५१६८४) या लेखाशिर्षाखली खर्ची टाकण्यात यावा व तो वित्तीय वर्ष २०२१-२०२२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच सदरचा खर्च हा याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

(अनुप कुमार सिंह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे कार्यालय

प्रति,

पोलीस आयुक्त, ठाणे शहर